आपण हा लेख www.maanavta.com या अध्यात्मिक वेबसाईट वर वाचत आहात.

संपादकीय

न्यायाची निंदा

ढेकूणांच्या समर्थनार्थ मच्छरांची साक्ष

लेखक – श्री. राम कुमार 'सेवक' जी मुख्य संपादक – www.maanavta.com

मानवतेचं क्षेत्र खुप विशाल आहे, हे तेवढेच असिम (विशाल) आहे, जितके की अध्यात्म. अध्यात्मास कुण्या धर्म, जात, सांप्रादाय इत्यादींच्या सिमेत बंदीस्त करता येणार नाही. अध्यात्माची मक्तेदारी कुणाकडेही नाही. अध्यात्मास समजण्याकरीता आपली दृष्टीस (Vision) विशाल करावे लागेल, रूढी परंपरांपासुन आलीप्त होऊन गहन विचार करावा लागले. आज मी मान्यतांच्या सिमारेषापासुन अलीप्त होऊन अध्यात्मीक अनुमानांन (निष्कर्ष) पर्यंत जाण्याचा प्रयत्न करतोय.

भारतीय चित्रपट सृष्टीची शतकपुर्ती २०१२ या वर्षी झाली. मला 'शोले' या चित्रपटातील ते दृष्य आठवत आहे ज्यात 'जय' बनलेला अमिताभ बच्चन आपला मित्र धर्मेंद्र उर्फ विरूच्या लग्नाच्या बोलणीसाठी मावशीकडे जातो, आणि तेथे गेल्यावर मावशीसमोर असे प्रशंसायुक्त चित्र रेखाटतो की, धर्मेंद्र जुगारी, दारूडया, अय्याशी वाटायला लागतो. समजत नाही की लग्न जोडण्यासाठी आलेत की तोडण्यासाठी. मावशी आपल्या चेतनबुध्दीनुसार लग्न (नातेसंबध) न जमवण्याचा निर्णय करते, जो कुणाही आई, मावशी, आजीचा योग्य निर्णय असेल. चित्रपटात पुढे जे काही झाले, त्याच्याशी आमचे काहीही घेणे नाही, परंतु वास्तवतेच्या पटलावर बघितले तर जाणवेल की जसे हे ढेकूणाच्या समर्थनार्थ मच्छराने त्याची बाजु मांडलीय.

जसे ढेकूण मच्छरांच्या समर्थनार्थ म्हणतोय, ''साहेब, हा अगोदरच इतका दुर्बल आहे की, कुणाचे रक्त हा काय पिणार.'' आणि मच्छर आपली वेळ आपल्यावर ढेकूणा विषयी म्हणतोय, हा दिसायला जाडजुड आहे, परंतु आहे पुर्णत: अहीसंक, खुपच मेहनती प्राणी आहे. खाटेत कधी इकडे जातो, कधी तिकडे, परंतु धुळीशिवाय काहीही मिळत नाही, बिचाऱ्यास.

या साक्षीवर कुणी व्यक्तीने विश्वास करून मच्छर आणि ढेकूण दोघांना निर्दोष सोडुन द्यावे, तर आम्हास जाणवेल की, न्यायाची परिस्थिती काय असेल?

समाजात आज हेच होत आहे, सज्जन विखुरलेले आहेत, तर अपराधी एकजुटीत आहेत. दिल्लीत काही दिवसांपुर्वी एका सज्जनाने आपल्या नातेवाईकांच्या घराखाली रिक्षा उभी केली आणि वरती (नातेवाईकांकडे) चालला गेला. परत आल्यावर नातेवाईकांच्या शेजाऱ्याने त्याची त्या ठिकाणी रिक्षा उभी करण्याकारणे हत्या करून टाकली. त्याच्या पत्नीने खुप आंकड—ताडंव केले, की कुणीतरी मदत करेल. परंतु जवळ कुणीच आले नाही आणि तो हतबल प्राणी मरण पावला.

दिल्लीतच एक भाजी—पाला व्यापाऱ्याने आपल्या ग्राहकांना खिसेकापुंपासुन वाचवण्यासाठी खिसेकापुंना बोलला तर त्यांनी त्यास मारून टाकले.

अपराधी संगठीत आहेत, सज्जन मौन बाळगुण आहेत, वर्तमान पत्र त्या बातम्या (घटना) प्रकाशीत करणार, सज्जन व्यक्ती ते वाचणार, पंधरा दिवसांनंतर मात्र वर्तमानपत्र रद्दीत जाणार. कथानक संपले. दोन परिवारातील दोन कमवते निर्दोष व्यक्ती मारले गेले.

सज्जन तर हेच सांगणार की, कुणाच्या तंटयात का पडायचे. विरोध करायचा नाही, किंवा खिसेकापु पाहिजे ते करो, आम्हाला आमचे खिसे सांभाळले पाहिजेत. दुसऱ्यांशी आम्हाला काय घ्यावयाचे. कुणी कथित सन्यासी या विषयी हे सुध्दा म्हणु शकतो की, चला, चांगले झाले, या नश्वर संसारातुन चालला गेला. येथुन जाणेच योग्य आहे.

वरील प्रतिक्रिया पहा — यालाच म्हणतात — गंभीर स्वार्थ.

हे कुणीच विसरायला नको की, बाजुला जर आग लागली तर ती आमच्या घ ारापर्यंत जरूर येईल, त्याकरीता तिला विझवणे आवश्यक आहे.

कठीणता तर ही येते की, कुणी सज्जन या सामाजिक जाणीवतेने जर चिंतीत होत असेल, तर तो स्वत: धोक्यात येऊन जातो, कारण त्यास कुणीही पाठबळ (समर्थन) देत नाही आणि त्यास मुर्ख समजले जाते. म्हटले जाते की, तुला काय गरज होती? घरातील तसेच बाहेरील सर्वांचे एकच मत असते. एक बुध्दीमान मनुष्य मुर्खांच्या श्रेणीत बसविला जातो.

या विषयी अध्यात्म काय सांगतय, चला विचार करूया....

या विषयी कुणीही सांगणार की, या विषयाचा संबध अध्यात्माशी नाहीच. हा तर पोलीस आणि न्यायालयाचा विषय आहे. प्रथम दृष्टीत ही बाब योग्यही वाटते, परंतु महात्मा म्हणतात —

''प्रत्येक कठीणतेच उत्तर सद्‌गुरूच आहे.
काल सुध्दा सद्‌गुरू होते, आज सुध्दा सद्‌गुरू आहेत.''

सद्‌गुरू अर्थात अध्यात्म. अध्यात्म या विषयात महात्मा गांधींचे तीन माकडांपैकी एक निश्चित नसेल, निश्चितच अध्यात्मात याचे समाधान (उत्तर) असले, चला विचार करूया.

चिंतनास अध्यात्माकडे वळवल्यास तीन निष्कर्ष (अनुमान) निघतात, जे खालीलप्रमाणे आहेत....

१. परमेश्वराची इच्छा मानुन शांत होऊन जाणे.
२. अपराध्यास सद्‌बुध्दी मिळो ही प्रार्थना केली जावी.
३. पीडीत परिवारांची यथा योग्य मदत/सेवा केली जावी.

हे तिघे अगदी योग्य उत्तरे आहेत, परंतु सामाजिक दृष्टीने काय महत्वाचे आहे हाही विचार करावा लागले. अध्यात्म प्रत्येकाचा वैयक्तिक विषय असतो, त्याकरीता अध्यात्माचे तिन्ही उत्तरे माणसालाच सल्ला (समज) देत आहे, समाज, राष्ट्र, विश्व इत्यादींना अध्यात्म काहीच सांगत नाही.

मच्छर आणि ढेकूणांच्या एकजुटीत मानवी समाजाला स्वत:स कसे वाचविण्याचे आहे, ते त्यास स्वत:च विचार करावा लागेल नाहीतर अपराधीरूपी ढेकूण आणि मच्छर समाजाचे रक्त पिऊन त्यांना पोकळ करत राहणार. न्यायदेवी तर काही बघतच नाही. न्यायाधिश महोदय तर साक्षी–पुरावाच बघत असतात. ईमानदार व्यक्ती तर साक्षी देण्यापासुन दुरच असतात मग योग्य पुरावा येईल कुठुन? पिढीत एकटा पडतो आणि बरेचसे ढेकूण आणि मच्छर निर्दोषमुक्त होतात, या कारणास्तव गितकार लिहतो – ''यह अंधा कानुन है''

शेवटी निष्कर्ष हाच निघतो की, ढेकूण आणि मच्छरांच्या एकतेसमोर तर सज्जनांची एकजुटताच काही चमत्कार दाखवु शकते, ती कधीपर्यंत येणार ते भगवंतच जाणतो.

राम कुमार 'सेवक'
rksewak@yahoo.co.in

अनुवादक
सुकदेव पाटील
sukdeo_behere@yahoo.co.in